।। श्री सद्‌गुरु प्रसन्न ।।

ज्ञानाकृतं भोजनम्।

# पाझर अमृताचा


नोंदणी क्रमांक : MAHMAR/2004/14372

❖ वर्ष १० वे ❖ अंक ३ रा ❖ श्रावण - भाद्रपद शके १९३५ ❖ ७ ऑगस्ट २०१३ ते ४ ऑक्टोबर २०१३

**प्रकाशक व मुद्रक:**
**श्री प्रदीप कुलकर्णी**

**मालक :**
**श्रीदत्त प्रकाशन,**
श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर
{नोंदणी क्रमांक : E-17128 (M)}
संपर्क : ९८२०५४९४१५
Website - www.shridatt.org

**प्रकाशनस्थळ :**
**श्रीदत्त प्रकाशन,**
श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर,
डी-७, दर्शन सोसायटी, प्लॉट नं. २,
गोराई, बोरीवली (प) मुंबई ९२

**मुद्रणस्थळ :**
**सुदर्शन आर्ट प्रिंटिंग प्रेस**
१०, वडाळा उद्योग भवन, वडाळा, मुं - ३१.

संपादिका : **सौ. नीता कुलकर्णी**

संपादन सहाय्य : **सौ. प्रतिभा गोखले**
**सौ. शामला आपटे**


## अंतरंग


◆ भक्तगाथा ०३

◆ गोजिरवाणी ०५
- सौ. नीता कुलकर्णी

◆ भागिरथीच्या काठावर... ०६

◆ उत्सव विशेष ०७

◆ किशोर की शोर ०८
- सोहम जोशी

◆ गुंजारव १०
- हिमगौरी जोशी

◆ तरुणाई १२
- तनुजा

◆ रुचि रुचि भोजन १५

# संपादकीय...✍

शब्दांची रचना ही विलक्षण असते. त्यांची ताकदही मोठी असते. ती जशी मारक असते तशीच तारकही असते. याचेच प्रत्यंतर 'भागिरथीच्या काठावर...' वाचताना येईल. गुरुमुखे तेच शब्द आपले वळण बदलतात व हृदयाला जाऊन भिडतात. ते नुसतेच भिडतात का? तर ते तुमच्यात आमुलाग्र बदलही घडवतात. मग मात्र 'शब्द शब्द जपून ठेव...' अशी परिस्थिती होते. कारण ते शब्द आता नुसते शब्दच न उरता आपल्या जीवनाला वळण लावणारे, मार्गदर्शन करणारे वाटाडे ठरतात.

'भक्तगाथे'तही श्रीसस बलभीम महाराजांच्या कीर्तनाचे सुरेख वर्णन आले आहे.

सद्‌गुरुमुखातील याच शब्दांना प्रतिसाद येतो तो विविध वयोगटांमधून! प्रत्येकजण आपआपल्या शब्दांतून हृदयांतर्गत अर्थ मांडत असतात. ह्याचा प्रत्यय 'किशोर की शोर', 'गुंजारव' व 'तरूणाई' वाचताना येईल.

'मिळूनी शब्दांत साऱ्या, अर्थ माझा वेगळा...' असेच तर गुरुदेव सांगतात नाही का?

**पान नं. ४ वरून**

या पत्रावरून रा.ब. भिडे यांचे अंत:करणावर बोवांचे कीर्तनाचा कसा परिणाम झाला होता व बोवांविषयी त्यांचा किती आदर होता हे दिसून येईल.

देवास येथे असताना पुष्कळांचे घरी बोवांची कीर्तन झाली, त्यांची कीर्ति रा. भिडे यांच्या मुखे देवासच्या मोठ्या मासाहेब श्रीमती 'गोजराबाई' यांच्या कानावर गेल्यामुळे, त्यांनी आपले वाड्यात बोवांचे कीर्तन करविले. बोवांचे कीर्तन ऐकून त्यांसही अत्यंत आनंद झाला व बोवांच्या साधुत्वाबद्दल त्यांची पूर्ण खात्री झाली. पुढे मासाहेब आपली बग्गी पाठवून बोवांस आपले घरी वारंवार बोलावून घेत व वेदांत विषयावर बराच काल चर्चा करीत असत. त्यांना बोवांनी जी पत्रे लिहिली आहेत ती फारच प्रेमळ व बोधप्रद आहेत. ■■■

आनंद बाहेर कोठेही नाही. तो तुमच्याच जवळ आहे. पूर्व संकल्पाने क्रिया होतात, त्यावर लक्ष न ठेवता 'मी'वरच लक्ष ठेवावे म्हणजे आपल्या जवळचा आनंद मिळेल.

**- श्रीसस भागीरथीनाथ**



# भक्तगाथा...✍

एके दिवशी गंगाधरशास्त्री यांस बोवासाहेबांपासून अनुग्रह घेण्याची इच्छा झाली व ती त्यांनी बोवांस प्रकट करून दाखविली. बोवांनी त्यास आपले सद्‌गुरु श्रीलक्ष्मणमहाराज यांजपासून अनुग्रह घेण्याविषयी सांगितले. ही गोष्ट गंगाधरशास्त्री यांस मुळीच पटली नाही. त्यांनी बोवांपासूनच अनुग्रह घेण्याचा हट्ट धरला. नंतर थोडे दिवसांनी बोवा श्रीलक्ष्मणमहाराजांस इंदूरहून देवाशास घेऊन आले. गंगाधरशास्त्री, साने इंजिनीअरसाहेब, काळकर मास्तर, देसाई मास्तर, बळवंतराव पटवर्धन, दत्तमहाराज (बोवांचे चिरंजीव), सौ. कृष्णाबाई (बोंवाची पत्नी) वगैरे बऱ्याच मंडळींनी यावेळी श्रीलक्ष्मणमहाराजांचा अनुग्रह घेतला. महाराजांनीही सर्वांची उत्कट इच्छा पाहून सांप्रदायाप्रमाणे सर्वांस यथायोग्य आत्मबोध केला व नंतर इंदूर येथे गेले. पुढे गंगाधरशास्त्री हे थिऑसफीस्ट असल्याने त्यांच्या मनात तर्ककुतर्कांचे वारे शिरून त्यांची आपल्या गुरुवरील श्रद्धा व भक्ती उडाली. हे पाहून बोवास फारच वाईट वाटले. प्रथम विचार करून सद्‌गुरुस शरण जावे. आत्मप्रतीति, शास्त्रप्रतीति व गुरुप्रतीति या तिहींचा मेळ जमला तर मात्र श्रीगुरुंवरील श्रद्धा ढळू नये, उलट ती वाढावी. श्रीगुरुप्रतीति म्हणजे श्रीगुरुंचा बोध. हा सत्य आहे की असत्य आहे हे शास्त्रप्रतीतिवरून कळते. श्रीगुरुपदेश शास्त्रविरूद्ध असेल तर तो मानू नये. परंतु तो जर शास्त्र व श्रुति यास संमत असेल तर तो अवश्य प्रमाण मानावा. श्रीलक्ष्मणमहाराजांचा बोध तीनही प्रतीतीस पटण्यासारखा असतानाही शास्त्रीबोवांसारख्या विद्वान माणसांस पटू नये व त्यांच्या डोक्यात थिऑसफीचेच कुतर्कांचे वारे भरावे याबद्दल बोवांस फार खेद वाटला. गंगाधरशास्त्री यांची भक्ति श्रीगुरुवरून कमी होऊ नये एतदर्थ एकवार पुन्हा त्यांस आपण स्वधर्मांतर्गत बोध व सिद्धांत सप्रमाण पटवून द्यावा म्हणून बोवा स्वतः शास्त्रीबोवांच्या घरी जाऊन त्यांस बोध समजाऊन सांगण्याचा प्रयत्न करीत. परंतु शास्त्रीबोवांच्या मनावर काहीच परिणाम झाला नाही. नंतर बोवांनी सच्चिदानंद या विषयावर व्याख्यान लिहिले व ते देवास येथील ह.भ.प.रा.ब. भिडे, कुंटे, गंगाधरशास्त्री वगैरे मंडळीसमक्ष रा. भिडे यांचे घरी वाचून दाखविले. त्या व्याख्यानाचे उत्तर देण्यास गंगाधरशास्त्री यांस सांगितले. इतके करूनही गंगाधरशास्त्री यांचे मन ताळ्यावर आले नाही. बोवांनी लिहिलेले व्याख्यान फारच मननीय आहे.

रा.ब. रावजी जनार्दन भिडे यांस गंगाधरशास्त्री यांच्या मनाची चंचलता पाहून फारच वाईट वाटले. त्यांनीही त्यास पुष्कळ प्रकारे समजावून सांगितले. पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही. भिडेसाहेब बलभीमबोवांची योग्यता जाणत होते. बोवा महान भगवद्भक्त सत्पुरुष आहेत अशी त्यांची खात्री होती. त्यांचे वर्तन फार सत्त्वशील, सरळ व शुद्ध होते. त्यांच्या भक्तियुक्त अंतःकरणात बोवांचे ज्ञानबीजारोपण झाल्याने त्यांस चिरसुखरूप फलाचा आस्वाद घेता आला.

एके दिवशी कर्मधर्मसंयोगाने भिडे यांच्या पत्नीस त्यांचे राहते वाड्यात एक हनुमंताची लहान मूर्ती सापडली. तिची स्थापना देवासच्या जवळील आखेपूरगांवी करण्याचे त्यांनी योजिले व तेथे नवीन मंदीर बांधून त्या मूर्तीची स्थापना करण्याच्या समारंभी रा.ब. भिडे साहेबांनी बोवांचे कीर्तन करविले. त्या वेळेस धारचे काशीनाथपंत लेले, पटवर्धन वगैरे बरीच विद्वान मंडळी हजर होती. बोवांच्या कीर्तनास आरंभ झाल्यापासूनच विलक्षण बहारीचा रंग आला होता. कीर्तनास रा.ब. भिडेसाहेब व लेलेसाहेब वगैरे रसाळ श्रोते पुढे बसल्यामुळे बोवांस अधिकाधिकच प्रेम येऊन कथेस रंग चढला. त्यादिवशी कीर्तनास श्रोता वक्ता एकचित्त होऊन सर्वांचे अंतःकरण प्रभुप्रेमाने भरून गेले. रा.ब. भिडे व बोवा यांच्या नेत्रातून तर प्रत्यक्ष प्रेमाश्रूच्या धाराच वाहू लागल्या व कथेनंतर सर्वांनी बोवांच्या पायावर मस्तक ठेवून त्यांस धन्यवाद दिले.

रा.ब. भिडे यांचे बोवांवर किती प्रेम होते याविषयी त्यांनी रा. काशीनाथपंत लेले यास लिहिलेल्या पत्रांवरून समजून येते. त्यातील निवडक उतारा नमुना खालीलप्रमाणे

"I am gratified at the consummation of the Akhepur temple project. The same providence will bring me the fulfilment of my other cherished desires. I saw the Masahib Shri Gojrabai of Dewas yesterday and told her of the Bowa's kirtan. She was so charmed with the summary. I gave her, that she is going to have the same kirtan at her house at Dewas. The Kirtan was the subject of talk between me and my people all the way from Akhepur since. The spell still lasts and it fortifies one against any seeming dis-appointments and failures. It is a tonic, it is a feast. I can never forget it.

**पान नं. २ वर**



# गोजिरवाणी...✍

**- सौ. नीता कुलकर्णी**

**आजी** - मुलांनो, श्रीकृष्णाच्या गोष्टी तुम्हाला आवडतात ना?

**मुले** - हो आजी, आम्हाला फार आवडतात श्रीकृष्णाच्या गोष्टी!

**आजी** - तुम्हाला माहितीच आहे सुदामा श्रीकृष्णाचा बालमित्र होता. तो एकदा श्रीकृष्णाकडे पत्नीच्या सांगण्यावरून गेला होता.

**मुले** - आणि त्याने आणलेले पोहे श्रीकृष्णाने आवडीने खाल्ले ना?

**आजी** - हे तर तुम्हास माहितीच आहे. परंतु श्रीकृष्णाकडे तो काही दिवस राहिला होता. एक दिवस श्रीकृष्णाच्या महालातील विविध दालने पाहत असताना त्यास तेथे देवघर दिसले.

**मुले** - हो? श्रीकृष्ण स्वतःच तर देव होता, मग त्याच्याकडे देवघर?

**आजी** - हो, अरे हाच प्रश्न सुदाम्याला पडला. म्हणूनच उत्सुकतेने तो तेथे आत शिरला आणि आश्चर्यचकित झाला.

**मुले** - काय होते तेथे?

**आजी** - अरे तेथे राधेची मूर्ती होती, अर्जुनाची मूर्ती होती, उद्धवाची होती आणि सुदाम्याचीही होती. आपली स्वतःची मूर्ती बघून त्यास अश्रू आवरेनात.

**मुले** - पण असे कसे आजी?

**आजी** - अरे, भक्त देवाची भक्ति करतो. पण भगवंत कल्पनेपलिकडे भक्ताची प्रीती करतो.

**मुले** - हो आजी?

**आजी** - हो तर! 'विज्ञानसागर' ग्रंथात याचे सुरेख वर्णन आले आहे. 'मद्भक्त ते माझे प्राण। भक्तांचे मी आधीन।। भक्त माझे आभूषण। कंठमणी तो आवडता।।' तसेच 'भक्त माझे धन धाम। भक्त माझा विश्राम।। भक्त माझा परम। जीवींचा तो जिवलग।।' कळला का तुम्हाला अर्थ?

**मुले** - हो आजी, आम्हाला आज हे नव्यानेच कळले.

# भागिरथीच्या काठावर बसले असताना अंगावर उडालेले ज्ञानतुषार...✍

## सदाचार

१७) वेदांते करावे श्रवण। दृष्टांतयुक्तिने व्हावे मनन।
योगे नित्य निदिध्यासन। तेव्हा भेटी आपुली।।१७।।

**अर्थ -** वेदांते म्हणजे 'देह मी, माझा' या नित्याच्या जाणीवा थांबवून गुरुमुखाने श्रवण करावे. दिलेल्या दृष्टांताची युक्ती वापरून मनन करावे, श्रवण व मनन यांची एकवाक्यता होते, तेव्हा सहज ध्यास लागतो व ध्यासाने स्वरूपाची भेट होते.

**भावार्थ -** देहच मी आणि माझे या नित्याच्या जाणीवा बाजूला सारून सद्‌गुरु मुखाने आत्मज्ञानाचे श्रवण करावे. श्रवण करताना दिलेले दृष्टांत व युक्त्या लक्षात ठेवून तसे वागण्याचा प्रयत्न करावा म्हणजे सहज मनन घडते. मननानेच ध्यास लागतो. एखाद्या व्यक्तीचा किंवा वस्तूचा ध्यास घेतल्यावर दुसरे काही सुचत नाही. ध्यानी मनी स्वप्नी तीच व्यक्ती किंवा वस्तू दिसते. अगदी तसेच स्वरूपाचा ध्यास लागल्यावर सहज भेट घडते.

१८) शब्दाची अचिंत्य रचना। शब्देचि पावे अपरोक्ष ज्ञाना।
जैसा निजेला पुरुष जाणा। शब्दें जागा होय।।१८।।

**अर्थ -** शब्दांची रचना अचिंत्य म्हणजे विचारातीत आहे. शब्दांनीच प्रत्यक्ष ज्ञान मिळते, जसे एखादा निजलेला पुरुष मारलेल्या हाकांनी जागा होतो.

**भावार्थ -** शब्दांची रचना विचारांच्या पलिकडे आहे. शब्दांमुळेच नामरूप कल्पिले जाते. शब्दानेच मिथ्या जग निर्मिले जाते, तेच खरे वाटते. परंतु हे सर्व अज्ञानात असेपर्यंत असते. जसे एखाद्या झोपलेल्या मनुष्यास जाग आणण्यास शब्दच सहाय्यभूत होतात, तसेच ज्ञानाची पहाट होण्यास सद्‌गुरुमुखातून आलेले शब्दच जरूरी असतात. या जगाला सत्यत्व देऊन त्यात रमणाऱ्या जीवाला अज्ञानाची गाढ झोप लागलेली असते. इथे सद्‌गुरु शब्दांनीच शिष्याला त्याच्या शिवत्वाची ओळख करून देतात आणि हळूहळू शब्दांचा अचिंत्य (आपल्याला न कळणारा अर्थ) म्हणजेच शब्दांच्या अचिंत्य शक्तीने स्वरूपात मिळवून घेतात.



१९) आत्मानात्मविवेके करून। तत्काळ होय निर्मळ ज्ञान।
गुरुने शिष्य बोधितां जाण। शब्द लंघून अर्थ पावे।।१९।।

**अर्थ -** आत्मा व अनात्म्याचा विवेक केल्याने तत्काळ निर्मळ ज्ञान होते. गुरुने शिष्यास बोधल्यावर शब्दांच्या पलिकडील अर्थ जाणला जातो.

**भावार्थ -** आत्मा काय व अनात्मा काय याचा अंतरात विचार व्हावयास हवा. बुद्धीने याचा निवाडा केला की उरते ते निर्मळ शुद्ध ज्ञान! 'तेच तू आहेस' हे सद्‌गुरुमुखातून बोध झाल्यावर शिष्याला कळते. अशा तऱ्हेने सद्‌गुरु शब्द ओलांडून शब्दाच्या पलिकडे असलेल्या स्वरूपात शिष्याला मिळवून घेतात.

२०) तू देह नव्हेसी दृश्य। इंद्रिये प्राण पावती नाश।
विकारी मन बुद्धि नव्हेस। घटाचे परी।।२०।।

**अर्थ -** ज्याप्रमाणे घट पाहणारा घटाहून भिन्न आहे, त्याप्रमाणे तू दृश्य देह नाहीस आणि विकारणारे मन व बुद्धी तू नाहीस आणि इंद्रिये व प्राण हे नाश पावणारे आहेत.

**भावार्थ -** ज्याप्रमाणे घटाला पाहणारा हा घटापेक्षा निराळा आहे, अगदी तसेच दृश्य असा जो स्थूळ देह याला पाहणारा तू देहापेक्षा निराळा आहेस. तुला भासमान होणारी इंद्रिये व प्राण हेही कालांतराने नाश पावणारे आहेत आणि चंचल मन व अनिश्चित बुद्धी ही विकारवश आहेत. हे पाहणारा तू त्यांच्यापेक्षा निराळा आहेस.

# उत्सव विशेष...

## गुरुपौर्णिमा उत्सव

**आषाढ शु. सप्तमी ते आषाढ पौर्णिमा    दि. १५ ते २२ जुलै २०१३**

### मूळपद

ज्ञानमार्गीचे कापडी होती। निजधामासी टाकूनी येती।।धृ.।।
हेचि मागणे देवा। देई अखंड त्यांची सेवा।।१।।
पंथ त्र्याचे सांडुनि नांव। मूळमार्गाची घेती धाव।।२।।
आडवस्ती न करीती पाहो। दिन आहे तो पावले ठावो।।३।।
जेथे पावले तो ठाव जाले। नाही परतोनी माघारे आले।।४।।
केशव म्हणे ते गुरुराव पाही। चित्त अर्पिन त्याचिया पायी।।५।।

# किशोर की शोर...

**- सोहम जोशी**

**श्रीनृसिंह जयंती उत्सवात सादर झालेले प्रथम पारितोषिक विजेते नाटक...**

[(पात्रे : सचिन (साधा मुलगा), सचिनची आई, चंचल (बिघडलेला मुलगा), विवेक(चांगला मुलगा)]

(स्थळ : शाळेचा वर्ग, शाळेची मधली सुट्टी..... सचिन व विवेक शाळेत डबा खात आहेत.)

**सचिन** - विवेक, तू डब्यामध्ये काय आणले आहेस?

**विवेक** - मी पोळी आणि बटाट्याची भाजी आणली आहे.

**सचिन** - अरे वा, मी पण तेच आणले आहे. चल तर आपण डबा खाऊया! (दोन मुले वडापाव खात येत आहेत.)

**चंचल** - काय सचिन, विवेक कसे आहात?

**सचिन**- मी ठीक आहे.

**विवेक** - मीही ठीक आहे.

**चंचल** - सचिन, तुझ्याकडे पैसे आहेत का?

**सचिन** - नाही, माझ्याकडे पैसे नाहीत.

**चंचल** - सचिन, तु उद्या पैसे आणशील? आपण वडापाव खाऊया!

**सचिन** - चालेल.

(स्थळ : सचिनचे घर, सचिन शाळेतून येतो.)

**आई** - सचिन, घरी आलास?

**सचिन** - हो, आई तुझी कामं करायची आहेत का गं?

**आई** - नाही रे, असं का विचारतो आहेस?

**सचिन** - काही नाही गं, उद्या तू डब्यात काय देणार आहेस?

**आई** - भेंडीची भाजी आणि पोळी!

**सचिन** - ए आई, तू मला दहा रूपये दे नं, वडापाव खायला!

**आई** - मला वाटलचं होत. म्हणूनच तू मला काम काय आहे विचारीत होतास



ना? अरे सचिन, बाहेरचं खाणं खाऊ नये, अशाने तुझी तब्येत खराब होईल.

**सचिन** - ठीक आहे, मी घरचेच खाईन.

(स्थळ : शाळेचा वर्ग, मधली सुट्टी)

**विवेक** - अरे सचिन, आज मी तुझी आवडती कारल्याची भाजी आणली आहे.

**सचिन** - नाही रे, आज माझा मूड बरा नाही, कारण आईने मला वडापावसाठी पैसे दिले नाहीत.

**विवेक** - जाऊ दे रे, आपण घरचा डबा खाऊन ताकदवान राहू या.

**सचिन** - चल, आपण डबा खाऊया.

**चंचल** - काय सचिन, कसा आहेस?

**सचिन** - मी ठीक आहे, पण आईने मला वडापाव खायला पैसे दिले नाहीत.

**चंचल** - काय म्हणाली तुझी आई?

**सचिन** - आई म्हणाली कँटीनपेक्षा घरचा डबा खाऊन ताकदवान राहशील.

**चंचल** - मी बघ, कँटीनचे खाऊनही ताकदवान आहे. आता मला वाटतं तुला घरी चोरी करण्याचाच उपाय राहिला आहे.

(स्थळ : सचिनचे घर, बेल वाजते)

**आई** - सचिन आलास का?

**सचिन** - आई मी जरा बेडरूममध्ये कपडे बदलून येतो. पण तू येऊ नकोस हं! (सचिन कपडे बदलण्याच्या बहाण्याने घरी दहा रूपयांची चोरी करतो व खेळायला जातो.)

(स्थळ : शाळा)

**सचिन** - चंचल, मी चोरी केली आहे. चल आपण कँटीनमध्ये जाऊन वडापाव खाऊया!

(जरा वेळाने) मस्त होता ना वडापाव!

(स्थळ : सचिनचे घर, बेल वाजते. आई दार उघडते)

**सचिन** - आई, मला आज बरं वाटत नाही. माझं डोकं दुखत आहे.

**आई** - तू जरा झोप, मी तुझ्यासाठी लिंबू सरबत आणते. (परत बेल वाजते. आई दार उघडते.)

**आई** - अरे विवेक, आज तू कसा काय आलास? सचिनला बरं वाटत नाही.

**विवेक** - मला त्याचे कारण माहित आहे.

**आई** - काय?

**विवेक** - हो काकू, आज त्याने घरी पैसे चोरी करून शाळेत वडापाव खाल्ला.

**आई** - काय सचिनने चोरी केली?

(तेवढ्यात सचिन बाहेर येतो.)

सचिन, अरे तू हे काय केलंस? मी हेच शिकवलं का?

**सचिन** - आई, मी काय करू मला वडापाव खायचाच होता.

**आई** - अरे तू हे काय केलसं, म्हणूनच तुला बरं वाटत नाही.

**सचिन** - मला माफ कर. मी परत असे करणार नाही.

**आई** - अरे हट्ट करावा, पण म्हणून त्यासाठी चोरी करायची का? सचिन, मी तुला मधून मधून घरी वडा बनवून देईन, पण परत तू कधीही चोरी करणार नाहीस असे मला वचन दे.

**सचिन** - हो आई, मी कधीही चोरी करणार नाही.

## गुंजारव...

**- हिमगौरी जोशी**

मनातील प्रश्न कधीही सुटत नसतात
पडलेल्या प्रत्येक प्रश्नाला उत्तरं मिळत नसतात
हीच उत्तरं शोधता शोधता आयुष्य निघून जाते
काही प्रश्नांची उत्तरं मिळाली तरीही समाधान नसते
हेच मन नेहमी गोंधळ घालत असते
कदाचित म्हणूनही समोर असूनही काही दिसत नसते
ही मनाची गुंतागुंत कधीही सुटत नसते
सुटली तरीही त्यापासून अलिप्त राहण्याची गॅरंटी नसते
या सगळ्यांची उत्तरं मिळण्यासाठी लागते ती त्याची साथ
साथ मिळताच सर्व काही उलगडत जाते
माझ्या प्रत्येक प्रश्नाला त्याचे उत्तर मिळत जाते
माझ्या जगण्याला आता नवीन सुरुवात होत असते
मग तो आणि मी वेगळे राहू शकत नाही
तो माझा होताच, माझी मला भेट पडल्याशिवाय राहू शकत नाही



## श्रीसस भागीरथीनाथ जयंती उत्सव

**आषाढ अमावस्या दि. १ ते ६ ऑगस्ट २०१३**

### मूळपद

गुरु चरणाचा अगाध महिमा वाचे वर्णवेना। शरण गेले ते उद्धरिले, पुनरावृत्ती ना।।धृ.।।
शास्त्री पंडित आश्चर्य करिती, म्हणती मोठे नवल।
जे जाती ते ब्रह्मचि होती, कसा अद्‌भुत खेळ।।१।।
बाया बापड्या, प्रपंच करिती राहती आनंदात।
सुख दुःखाचे आघात झेलती, सद्‌गुरु स्मरणात।।२।।
शिकल्या नसता घडघड कैसा, वेदांत बोलती।
कीर्तनी प्रवचनी शंका निरसन, युक्तीने करिती।।३।।
दत्ता भागीरथी, आबालवृद्धा, लाविती भक्तीला।
याच देही मुक्ती भोगा, शिकवी सर्वाला।।४।।

## श्रीसस माधुरीनाथ वाढदिवस उत्सव

**श्रावण शु. १३ ते परम १४ दि. १३ ते २० ऑगस्ट २०१३**

### मूळपद

अहं आत्मा सच्चिदानंद। अनुभव सुखाचा कंद।।धृ।।
गुरुरायाचा विनोद, मुमुक्षु साधका बोध, सहज कल्पना निरोध।
जीवेश उपाधी शोध। लाभ प्रमोद।।१।।
गुरुरायाची थट्टा, माया अविद्येसी लट्ठा, धीट सोडिताती हाट्टा।
प्राप्ती अजरामर पट्टा। मूख निषेध।।२।।
गुरुरायाचे हास्य, गंभीर तत्त्व रहस्य, स्थिती शांत समरस।
अगोचर अनिर्देश्य। विधी संवाद।।३।।
गुरुरायाची मस्करी, कबूल करावी चोरी, सोडवी आपुली थोरी।
मग बैसवी निजघरी। नित्य स्वच्छंद।।४।।
गुरुरायाचा खेळ। जीव ब्रह्म होय तत्काळ, लहान थोर बाळ गोपाळ।
भागीरथी करी सकळ। दत्ता प्रबुद्ध ।।५।।

# तरुणाई...✍

**- तनुजा**

## कस्तुरी

सूर्य उगवला तोच मुळी स्वच्छ सूर्यप्रकाश घेऊन. सकाळी उठल्यापासूनच तो अगदी खुशीत... तरल... किंबहुना गेल्या काही दिवसांपासूनच... पिसासारखं हलकं हलकं जणू... जणू तरंगतो आहोत हवेत... सगळं जग कवेत घ्यायचंय... सभोवताली दिसणारी घनदाट झाडी तर सोडाच... त्या उंचच उंच झाडांमधून मध्येच डोकावणारं आभाळ... सोनेरी किरणांची उधळण करणारा सूर्य... शरीराला आणि मनाला अलगद स्पर्शून जाणारी मंद हवा... विशेष म्हणजे... तो काही अंतरावर असणारा नदीच्या पाण्याचा स्रोत... ज्याने त्याला एक अनुभूति प्रदान केली होती... तेजाचं एक निराळं वलय देऊ केलं होतं... सगळं त्याला मुठीत हवं होतं स्वतःच्या... एवढचं काय... काल रात्री तर हट्टच धरला त्याने... ते दुरवर दिसणारे, त्याला वेडावून दाखवणारे तारे त्याला हवेत! कारणही तसंच घडलं होतं...

काही दिवसांपूर्वी पहिल्यांदाच तो पाणी पिण्यासाठी नेहमीप्रमाणे जवळच्या तलावावर न जाता दूरवरच्या खळाळणाऱ्या नदीवर गेला होता... नदीमधल्या पाण्यात त्याने रूप पाहिलं होतं स्वतःच... काहिसं अस्थिर... पण तरीही स्वच्छ. तलावातल्या पाण्यात इतकं स्वच्छ रूप कधी दिसलंच नव्हतं! अर्थात जे दिसतंय ते त्याचंच रूप याची जाणीव त्याच्या भोवतालच्यांनीच करून दिली होती म्हणा त्याला! इतके दिवस लक्षातच आलं नव्हतं... समज तरी कुठे होती... लहान होता ना तो... बालिश! तहान भागेपर्यंत पाणी प्यायचं आणि निघून जायचं एवढंच माहित होतं!... पण आज तो टक लावून पाहत बसला होता स्वतःच्या रूपाकडे! आपल्याला इतरांसारखी मोहक नक्षीदार शिंग नाहीत याची जाणीव पुन्हा चटका लावून गेली... नव्याने... मीसुद्धा या जंगलाचाच एक भाग... मोठ्या कळपातला एक छोटा भाग बनून रहावं असं खूप वाटायचं त्याला. का स्वतःला अधोरेखित करायचं? विरून जावं ना आसमंतात! पण त्याच्यासारखे दिसणारे सगळेच एकटे...दुकटे... किंवा फारतर तिकटे! आणि हा जो काही गंध असतो ना माझ्याभोवती सतत... खरंतर तो वेड लावतो मला!!! पण काहीजण त्यामुळेच दूर जातात का माझ्यापासून? कुजबुजतात



माझ्याकडे बघून... टाळतात कधीकधी... आणि काहीजण इतके घुटमळतात आजुबाजुला की पळून जावं वाटतं त्यांच्यापासून लांब... माझं वेगळं रूप हेसुद्धा एक कारण असावं का त्यामागे? ही असली प्रश्नांची जंत्री तयार झाली होती त्याच्या मनात पाण्यात आपलं प्रतिबिम्ब बघून! अचानक कसलीतरी हुरहुर वाटायला लागली होती. भेदरला तो! पळत सुटला त्या नदीपासून लांब. मनच लागेना कित्येक दिवस त्याचं कुठेच! जवळच्यांनी हटकलं... खटकलं... पण उपयोग शून्य! पुन्हा पुन्हा नदीवर जायचा तो. काहीही झालं तरी या गंधाचा शोध लावायचाच या ध्यासाने.

असंच एके दिवशी नदीच्या काठावर गंधाच्या धुंदीत हरवलेला असताना त्याला गोष्ट आठवली... राजहंसाची... तोही असाच... सगळ्यांपेक्षा वेगळा... पण तो तर ‘राजहंस’ होता! मग ‘मी’ कोण? म्हणजे मलासुद्धा त्या राजहंसासारखी वेगळी ओळख असणार तर! कळपामध्ये राहून सुद्धा मला वेगळी ओळख असणार! हो... बरोबर! असणारच! मग मी का घाबरावं? काहीतरी गवसल्यासारखं वाटलं त्याला. हसू आलं त्याला, त्याच्याच इतके दिवसांच्या वेडेपणावर... त्या दिवसापासून या दिवसापर्यंत धुंदीत जगत होता तो कोणत्यातरी! नक्की काय ते समजत नव्हतं... पण काहीतरी होतं... वेगळं!!! एकच ध्यास घेतला होता... स्वतःची ओळख शोधण्याचा! सगळ्यांसारखाच मीही जगलो तर माझ्यात आणि त्यांच्यात फरक काय? **गरूडाचे पंख मिळालेले असताना सरपटण्यात मजा ती कसली!**

आज मात्र ही वेगळी वाट कसली दिसतीये??? निरखून पाहिलं त्याने तर काहीतरी चमकत होतं दूरवर. भुरळ पडली त्याला बहुतेक! तिकडे सापडेल मला माझी ओळख! सगळ्यांची नजर चुकवून त्या वाटेला लागला तो. ते जे काही चमकणारं होतं ना ते हवं होतं त्याला. स्वतःच्या गंधाइतकंच वेड लावलं त्याला त्या अद्भुत गोष्टीने! झालं! तिथे लागेल मला माझ्या गंधाचा पत्ता! पावलं चालायला लागली त्याची त्या वाटेवरून कुणीतरी खुणावत असल्यासारखी... आपसूकच... चालता चालता त्याच्या लक्षातही आलं नाही की कधी ते हिरवं गार, घनदाट, सुखावणारं अरण्य संपलं आणि काटेरी, बोचरं रान सुरु झालं. नंतर तर वैराण वाळवंट... लक्षात आलं तेव्हा तो थबकलाय.... हबकलाय... असं कसं काय होतंय हे? इतका काळ गेला आपण चालतोय! प्रचंड दिवस आणि अगणित रात्रीही गेल्या

बहुतेक! किती ते आठवत नाही... लक्षात नाही... लक्ष दिलंच नाही ना तिकडे! कारण चमकणारं जे होतं ते चमकतच होतं रात्रंदिवस! नजर खिळवून ठेवली होती त्या गोष्टीने! शरीरावर ताबा राहिलाच नव्हता कसला! मनाला एकच ध्यास... 'मला ते हवं!'... पण मी जितका पुढे आलोय तितकच ते अजून लांब गेलंय... आणि सभोवतालचा गंध मात्र वाढतंच चाललाय...

असं होऊन कसं चालेलं? मिळवायला तर हवंच ते... माझ्या वेगळेपणाची खूण नाही का ती? नाही... मला आणखी जोरात चालायला हवं... पावलं झपाझप पडू लागलीएत त्याची. अस्वस्थपणा वाढायला लागलाय. कुठेतरी खोलवर आत काहीतरी दुखायला लागलंय... शरीर तर केव्हाच थकलंय. पण त्याची पर्वा आता नाही. चटके बसायला लागलेत. झळा असह्य व्हायला लागल्या आहेत. पोळतोय तो... होरपळतोय... पण आता थांबायचं नाही. थांबून करणार तरी काय? आजूबाजूला सगळंच भयाण, भकास!!! शरीराचा त्रास ठीक एकवेळ... पण आत ही सगळी उलथापालथ कसली होतेय? ढवळून निघतंय आतमध्ये सगळं ते काय आहे? कोण पोखरतय आपल्याला आणि काय पोखरलं जातंय? आपलं 'असणं' हरवत चाललंय का? कुरतडत चाललंय का? काहीतरी उसवंतय... हि कसली अनामिक भीती वाटतीये? आणि कशाची? ती चमकणारी... आपल्याला प्रेमात पाडणारी गोष्ट आता नकोशी का वाटायला लागलीये? माझ्यातून बाहेर पडणारे हे असंख्य 'मी' आहेत तरी कोण? मला 'माझी' ओळख हवी होती... पण मग 'मी' असं असंख्य 'मी' मध्ये विभागला का जातोय? प्रत्येक 'मी' काहीतरी सांगतोय... प्रत्येक 'मी' काहीतरी 'वेगळं' सांगतोय... एका 'मी'च्या बोलण्याचा दुसऱ्या 'मी' च्या बोलण्याशी अजिबातच संबंध कसा नाही??? सगळ्यांनी फेर धरलाय माझ्याभोवती.. निघालो तेव्हा एकटेच निघालो होतो आपण! हे सगळे आले कुठून? आणि का? यांना काय अधिकार मला चहूबाजूंनी ओढण्याचा? मी नाही फरफटणार यांच्या मागे... पण ज्याच्यासाठी धावतोय तो, ते लांब पळतंय त्याच्यापासून... आणि ते जितकं अधिक कक्षेपलीकडे चाललंय तितकाच हा गंध ऊरात भरून जीव घुसमटतो आहे...

उधाण आल्यासारख्या सगळ्या भावना एकमेकांवर आदळायला लागल्या आहेत. पण लाटेने कितीही प्रयत्न केला सागरापासून वेगळं होऊन किनाऱ्याला लागण्याचा,



तरी पुन्हा त्याच्यातच विरून जाते ती!!! लाटेला स्वतःच वेगळं अस्तित्व नाही... अथांग समुद्राचाच ती एक भाग! त्याच्या मनातल्या भावना सुद्धा आता एकमेकांवर आदळून एकमेकांमध्ये मिसळल्या... सगळ्यांची मिळून एक भावना निर्माण झालीये... सशक्त... 'मी' पर्यंत पोहोचण्याची... एक क्षण काय झालं त्यालाही समजेना! पण पावलं थांबलीएत त्याची! शिंग नसण्याचं दुःख बाळगणारा मीच! चंद्राला कवेत घेण्याचं स्वप्न पाहणाराही मीच! माझ्याच भोवतालच्या गंधाने भारावून वेडापिसा होणाराही मीच! दूरवरच्या त्या अनामिक लोभस गोष्टीने आकर्षित होणाराही मीच! तो थांबलाय त्याच क्षणी ती अद्भुत, मोहक गोष्टही थांबलीये! माझ्या भोवतालच्या गंधाचा स्रोत 'तिथे' कसा असेल? सगळे 'मी' विरून चाललेत हळूहळू... शिवण घातली जातेय... विजेचा संचार व्हायला लागलाय शरीरात आणि मनात... गंध स्वच्छंदपणे सळसळतोय शरीरात... नाही... मी जे तिकडे शोधतोय ते तिकडे नाही इकडे आहे... माझ्यापाशी... माझ्याचपाशी!!! शांत वाटतंय आता... त्याच्यामागे धावलो नसतो तर? ते सापडलं असतं? वेगळ्या वाटेला न लागता तलावातच डुंबत राहिलो असतो तर पत्ता सापडला असता 'माझा?' वैराण वाळवंटात उभ्या असलेल्या त्याच्या शरीरावर शिंतोडे पडायला लागलेत पाण्याचे!!! नजर उचलली गेलीये त्याची आभाळाच्या दिशेने... शिन्तोड्यांचा वर्षाव सुरु झालाय... अवघा आसमंत त्या गारव्याने न्हाऊन निघालाय... अप्राप्य असं ते स्वप्नही हाताशी आलंय आता!!! फेर धरलाय आपसूक त्याने स्वतः भोवती... 'मी' फेर धरलाय 'माझ्या' भोवती! त्याला 'तो' सापडलाय! त्याला 'मी' सापडलाय!!!!

# रूचि रूचि भोजन

भोजन करो मेरे सद्‌गुरु भाई। प्रवृत्ति निवृत्ति ये रसोई बनाई।।धृ.।।
वैराग्य की बाती ये तीव्र लगाई। कर्म निष्कर्म की लकडी लगाई।
कारण देह की हंडी चढाई।।१।।
वर्णाश्रम दोनो दालचावल बनाई। प्रेम का घृत ऊपर परसोई।
तूर्यारूपकी भाजी बनाई।।२।।
उन्मनीका ग्रास अब देती है। भागीरथीकी विनति सुनीये।
बलभीम अपनेमें मिलालो भाई।।३।।

श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर, डी-७, दर्शन सोसायटी, प्लॉट नं. २, गोराई, बोरीवली (प) मुंबई ९२

To,

BOOK-POST

**संस्थेतील प्रमुख सप्ताह व उत्सव**

**श्री स.स. दत्तात्रय महाराज जयंती उत्सव**
पौष कृ.१

**महाशिवरात्र उत्सव**
माघ कृ १३

**श्री स.स. भागिरथीनाथ पुण्यतिथी उत्सव**
रंगपंचमी फाल्गुन वद्य ५

**नृसिंह जयंती उत्सव**
वैशाख शु. १३

**गुरुपौर्णिमा उत्सव**
आषाढ शु. १५

**श्री स.स. माधुरीनाथ वाढदिवस उत्सव**
श्रावण शु. १३ परम १४
दि. १३ ऑगस्ट ते २० ऑगस्ट २०१३

**श्री स.स. दत्तात्रय महाराज पुण्यतिथी उत्सव**
कार्तिक कृ. १
दि. १० नोव्हें. ते १९ नोव्हें २०१३

**मंदिरात केले जाणारे अन्य उपक्रम**

| | |
|---|---|
| **श्री स.स. बलभीममहाराज जयंती** | - गुढीपाडवा - चैत्र शु. १ |
| **श्री स.स. लक्ष्मणमहाराज जयंती** | - वसंतपंचमी - चैत्र शु. ५ |
| **श्रीरामनवमी** | - चैत्र शु. ९ |
| **श्री स.स. नारायण महाराज जयंती व पुण्यतिथी** | - आषाढ कृ. ५ |
| **श्री स.स. भागिरथीनाथ जयंती** | - आषाढ व. १५ दीप अमावस्या |
| **श्रीकृष्णजयंती** | - श्रावण कृ. १ ते ८ |
| **श्री स.स निरंजनस्वामी पुण्यस्थिती** | - परिवर्तीनी एकादशी- भाद्रपद शु. ८ |
| **श्री. स.स. बलभीममहाराज पुण्यतिथी** | - इंदिरा एकादशी - भाद्रपद व. ११ |
| **नवरात्र** | - अश्विन शु. १ ते ११ |
| **श्री स.स. निरंजनस्वामी जयंती** | - कार्तिक शु. ८ |
| **श्रीदत्तजयंती** | - मार्गशीर्ष १५ |
| **दासनवमी** | - माघ व.१ ते ९ |